सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानातील लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत सोयी-सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या उप-अभियानातंर्गत करमाळा नगरपरिषदेच्या मंजूर पाणी पुरवठा योजनेस पुरक अनुदान वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्र. पुरक- २०१५/प्र.क्र.७५/नवि-३३

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक- ३० जानेवारी, २०१६.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.एनयुआर- २०१२/ प्र.क्र. १२७/०९/नवि-३३, दि. ३१ ऑगस्ट २००९.

२) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे पत्र क्रमांक नपप्रसं/UIDSSMT/करमाळा DSR Diff. /२०१४/क.१३, दिनांक ३० मार्च, २०१४

प्रस्तावना:- नागरीकरणाचा वाढता वेग व व्याप्ती विचारात घेऊन केंद्र शासनाने देशातील लहान व मध्यम शहरांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाचे उप-अभियान लहान व मध्यम शहरांकरिता पायाभूत सोयीसुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) अंतर्गत राज्यातील "करमाळा " या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत केंद्र शासनाच्या मान्यतेने पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी केली जात आहे. सदरहू अभियानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्प किंमतीपैकी केंद्र शासन, राज्य शासन व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या हिश्श्याचा मंजूर आकृतिबंध पुढीलप्रमाणे आहे :-

UIDSSMT अंतर्गत मंजूर प्रकल्पाची एकूण किंमत	केंद्र शासनाचा हिस्सा	राज्य शासनाचा हिस्सा	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा
१००%	८० %	१०%	१०%

०२. सदरहू अभियानांतर्गत करमाळा नगरपरिषदेसाठी एकूण रु. ९.३९८७ कोटी किंमतीची पाणी पुरवठा योजना मंजूर झाली असून केंद्र शासन व राज्य शासनामार्फत करमाळा नगरपरिषदेस उपरोक्त वित्तीय आकृतीबंधानुसार सदर योजनेसाठी अनुक्रमे रुपये ७.५०९५ कोटी व रुपये ०.९४ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. संदर्भाधीन शासन निर्णयानुसार लहान व मध्यम शहरांसाठी पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या कार्यक्रमांतर्गत मंजूर प्रकल्पांसंदर्भात फक्त दरसूचीतील फरकामुळे प्रकल्पांच्या अंदाजपत्रकीय किंमतीत होणारी वाढ याची ५० टक्के रक्कम पुरक अनुदान स्वरुपात राज्य शासनाकडून संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना उपलब्ध करून देण्यात येते. तथापि देण्यात येणाऱ्या पुरक अनुदान रकमेचे वितरण केंद्र शासनाकडून दुसऱ्या हप्त्याच्या अनुदानाचे वितरण झाल्यानंतर तसेच दुसऱ्या हप्त्याच्या अनुदानाचा संपूर्ण खर्च झाल्यानंतर करण्यात येते. त्यानुसार

दरसूचीतील झालेल्या फरकामुळे करमाळा नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेस दरसूचीतील झालेल्या फरकामुळे होणाऱ्या वाढीसाठी ५० टक्के पुरक अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत सोईसुविधांचा विकास कार्यक्रम या उप-अभियानांतर्गत करमाळा नगरपरिषदेच्या मंजूर पाणी पुरवठा योजनेच्या किंमतीत दरसुचीतील फरकामुळे वाढ झालेली आहे. त्या अनुषंगाने करमाळा नगरपरिषदेची सदरहू पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पुरक अनुदान वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(रूपये कोटीत)

अ.क्र.	नगरपरिषद	प्रकल्प	प्रकल्पाची मूळ किंमत	निविदा मंजूर केलेल्या वर्षाच्या दरसूचीनुसार होणारी प्रकल्पाची किंमत (Insurance,WC charges व Contingency Charges वजा जाता)	दर सूचीतील फरकामुळे प्रकल्प किंमतीत झालेला फरक (Insurance,WC charges व Contingency Charges वजा जाता)	प्रकल्प किंमतीतील फरकाच्या रकमेपैकी ५० टक्के अनुज्ञेय अनुदान	वितरित करावयाचे पुरक अनुदान
१	२	३	४	५	६	७	८
१	करमाळा	पाणी पुरवठा योजना	९.३९८७	११.९९७३	२.५९८६	१.२९९३	१.२९९३

०२. यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर अनुदान **रूपये एक कोटी, एकोणतीस लक्ष, त्र्याण्णव हजार फक्त (रूपये ०१,२९,९३,०००/-)** इतक्या रक्कमेचा धनादेश मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद, करमाळा, जिल्हा सोलापूर (Chief Officer, Karmala Municipal Council, Karmala, Dist- Solapur) या नावे काढून तो मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद यांच्याकडे सुपूर्द करावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.

०३. वर नमूद नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने वितरित केलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र देणे संबंधीत नगरपरिषदेवर बंधनकारक राहील.

०४. प्रस्तुत योजनेतंर्गत सर्व प्रकल्पांची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर या योजनेमधून काय साध्य झाले याबाबतचा अहवाल सदर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने राज्य शासन व केंद्र शासनास सादर करावा.

०५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७/०४/२०१५ मधील नमूद परिच्छेद क्रमांक ७ ते १८ मधील सर्व अटींची तसेच सदर परिपत्रकासोबत जोडलेल्या परिशिष्ट

मधील अनु क्रमांक ०३ व ०९ मधील सर्व अटींची पूर्तता होत असल्याबाबत विभागाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत तपासून घेतले आहे.

०६. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्रशा.५, दिनांक २४/०७/२०१५ च्या अनुक्रमांक अ मधील परिच्छेद क्र. १ ते १० मधील सदर अनुषंगिक बाबींची पूर्तता होत आहे.

०७. करमाळा नगरपरिषदेस देण्यात येणा-या अनुदान **रूपये एक कोटी, एकोणतीस लक्ष, त्र्याण्णव हजार फक्त (रूपये ०१,२९,९३,०००/-)** इतक्या रक्कमेचा खर्च हा नगर विकास विभाग- मागणी क्रमांक एफ-२, २२१७, नगर विकास, (००) (६७) जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान/ लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रम/ लहान व मध्यम शहरांच्या एकात्मिक विकास कार्यक्रम या योजनांतर्गत प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यासाठी राज्यातील नगरपरिषदांना अतिरिक्त अनुदाने (२२१७ ८१४६) ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर), दत्तमत, १९२- नगरपरिषदांना सहाय्य या लेखशिर्षामधून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

०८. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागाच्या स्तरावरून निधी वितरीत करण्यास देण्यात आलेल्या अधिकाराच्या अनुषंगाने प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१५५४४१९९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sanjay Sharadchandra Gokhale

Digitally signed by Sanjay Sharadchandra Gokhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DEPUTY SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay Sharadchandra Gokhale
Date: 2016.02.04 15:54:56 +05'30'

(सं.श.गोखले)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
२. मा.विरोधी पक्ष नेते,महाराष्ट्र विधानसभा याचे खाजगी सचिव
३. मा.विरोधी पक्ष नेते,महाराष्ट्र विधानपरिषद याचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री सर्व यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
५. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई-३२
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.

८. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११.अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१२.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, तथा नोडल एजन्सी, वरळी, मुंबई
१३.उप सचिव (नवि-५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.कक्ष अधिकारी (नवि-५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. विभागीय आयुक्त, पुणे विभाग
१६. जिल्हाधिकारी, सोलापूर
१७. जिल्हा प्रशासन अधिकारी, सोलापूर
१८.मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद
१९.जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर
२०. कक्ष अधिकारी (नवि-०३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. कक्ष अधिकारी (नवि-०४), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. निवडनस्ती, नवि-३३.